Vol 4 Issue 1 Oct 2014

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

## Welcome to Review Of Research

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**


Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 2.1002 (UIF)
Vol. 4 | Issue. 1 | Oct. 2014
Available online at www.lbp.world

# *महाकाव्य काळातील स्त्रीयांची स्थिती : एक चिकित्सा*

*डॉ. ज्ञानेश्वर शामराव कडव*

इतिहास विभाग प्रमुख , ज. मु. पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा.

***सारांश :—***

स्त्रीमुळे रामायण व महाभारत घडले असा समज प्रचलित आहे. सीता ही रामायणाच्या तर द्रौपदी ही महाभारताच्या केंद्रस्थानी आहे. सीतेसाठी रामाने रावणाविरूध्द तर द्रौपदीच्या हट्टापायी पांडवांनी कौरवा विरूध्द युध्द केले. याचा अर्थ राजकिय व्यवस्थेला, शासनाच्या धोरणाला व कार्याला प्रभावीत करण्याइतके सामर्थ्य स्त्रीमध्ये होते हे सिध्द होते. पण उत्तर वैदिक काळात स्त्री स्वातंत्र्याचा संकोच होऊन स्त्री जीवनावर नानाविध बंधने आल्याचेही मानले जाते. अशास्थितीत स्त्रीयांच्या बाबतीतील वास्तविकतः काय होती, रामायण व महाभारत काळात स्त्री जीवन कसे होते, समाज व धर्माचा स्त्री विषयक दृष्टीकोन कसा होता याची चिकित्सा करण्याचा अल्पसा प्रयत्न आपल्या परीने सदर शोध निबंधाचे माध्यमातून केला आहे.

## *विवरण :—*

माणुस त्याच्या जीवन अस्तित्वाला पोषक ठरेल या दृष्टीने निसर्गाला अनुकूल बनविण्यासाठी निसर्गाशी जसजसा संघर्ष करीत गेला तसतसे जुन्या जीवन पध्दती आणि नीती नियम कोलमडून पडत गेले. त्याचे प्रतिबिंब जागतिक वाङ्‌मयात पडलेले आहे. मग ते ओडेसी असो की इलियड, ओरिस्तीया असो की महाभारत या साऱ्यांनी पुरूषांच्या कर्तृत्वाच्या शौर्यशाली परंपरा सांगितल्या आणि स्त्रीयांच्या मानखंडनेचे वर्णन केले. होमरचे संपुर्ण इलियड हे एका गुलाम स्त्रीवर मालकी हक्कातील संघर्षावर बेतलेले काव्य आहे.[1] पशुपालन व शेती हाच या काळातही महत्वाचा व्यवसाय असल्याचे दिसते. महाभारतातील संघर्षाचा प्रारंभ भूमीवरून झाला. सीता हा शब्द जमीनीनशी म्हणजे उपजाऊ शेतीसाठी पूर्वी वापरण्यात येत असे, रामायणात ती जमीन नांगरतांना सापडली, राम, बलराम, परशुराम इत्यादीची आयुधे कुऱ्हाड व नांगर ही शेती व्यवसाशी संबंधीत होती. रामायण व महाभारताचा केंद्र बिंदू द्रोपदी व सीतेवरील हक्क हा आहे. विवाह संस्थाच निर्माण झाली नव्हती अशा काळाचे काही उल्लेख महाभारतात येतात.[2] पांडू कुंतीला सांगतो की पुर्व काळी स्त्रीयांवर कोणतीही बंधने नव्हती.[3] उत्तर कुरू मध्ये पांडूच्या काळी देखील स्वैराचाराची प्रथा असल्याची माहिती मिळते. ज्या देशाच्या स्त्रीया केवळ मालकीच्या वस्तु नाहीत व जेथे खाजगी मालमत्ता अस्तित्वात नाही. असा बौध्द वाङ्‌मयात, या प्रदेशाचा उल्लेख आढळतो.[4] अतिप्राचीन आर्यकाळ व कौरव—पांडवांचा काळ यामध्ये काळाचे बरेच अंतर असून सुध्दा मातृनामोत्पन्न अपत्यनामांची रेलचेल असल्याचे दिसते. कौतेय, पार्थ, राधेय, गांगेय, सौभद्र, माद्रेय, द्रोपदेय इत्यादी पांडव कुळातील व्यक्तींची नांवे मातृनामोत्पन्न आहेत. कृष्णाला देवकीनंदन हे नांव वासुदेव या नावाचा अपर र्प्याय म्हणून दिलेले वारंवार आढळते. हयावरून प्राचीन काळी मातृप्राधान्य जावून कुटुंबात पितृप्राधान्य यावयास किती प्रयास पडले असतील व प्रजापती संस्था म्हणजे एकपतीत्वाची संस्था प्रचलित व्हावयास किती अउचणी आल्या

असतील त्याचा अंदाज होण्यासारखा आहे.[5]

जेव्हा महाभारत लिहिले गेले त्या काळी एक पतिपत्नी लग्न संस्थेचा पुर्ण विकास झाला नव्हता. आणि एकाच वेळी अनेक प्रकारच्या लग्नांचे प्रकार अस्तित्वात होते. मातृसत्ताक पध्दतीमुळे बहुपतीकत्वाची रीत प्रचलीत होती. परस्परात वैवाहीक संबंधही निर्माण झाले. नाग हे आर्य नव्हते पण अर्जुनाने एका नाग कन्येशी विवाह केला. हा काही अपवाद नव्हता.[6] रामायण, महाभारतात 500 वर्षाचे अंतर आहे. पण जेव्हा रामायण लिहीले गेले, तेव्हा एक पतीपत्नीची लग्नसंस्था भक्कम करण्यावर भर होता. स्त्रीयांचे पतिव्रत्य आणि प्रामाणिकपणा सिध्द करण्यावर मुख्य भर होता. समाजाच्या वरच्या थरातील सर्व व्यक्तींना एकापेक्षा अधिक स्त्रीया होत्या. दशरथाला तीन व रावणाला अनेक स्त्रीया होत्या. द्रोपदी पांच पुरूषांची पत्नी होती याचा अर्थ त्या काळी बहुपतीत्व अस्तित्वात होते. महाभारतात द्रोपदी म्हणते 'विवाहीत स्त्रीला राज्यसभेमध्ये आणू नये. हा सनातन धर्म कौरवांनी मोडला आहे. त्यावरून एवढेच अनुमान करता येते की उच्च घराण्यातील स्त्रीया पडदया शिवाय सहसा जनसंपर्कामध्ये येत नसत. रामायण काळात सती प्रथेची एक घटना सांगितलेली आहे. महाभारतात पंडूची पत्नी माद्री सती गेल्याचे दिसते. कृष्णाच्या रूक्मीनी, शैल्या, हेमवती, या स्त्रीया सती गेल्याचे दिसते. प्राचीन जमातीत पुरूषांबरोबर त्यांचे आवडते खाद्यपेय, पदार्थ, कुत्रे, आवडत्या स्त्रीया, यांचेही दफन केले जात असे. भारतात ही प्रथा शकांनी आणली असा समज आहे.[7] स्त्री, पुत्र व दास यांना धनाधिकार नाही ते जे कमवतात त्याच्यावर त्यांच्या मालकाचा, पती, पिता, स्वामी यांचा अधिकार असतो. असे महाभारत सांगते. पांडवात प्रत्येक भावाला वेगळी पत्नी होती म्हणजे पृथक लग्ने करण्याची चाल पडत चालली होती. कौरवामध्ये एकटया गांधरीला 100 पुत्र झाले. अनेक स्त्रीयांपासून धृतराष्ट्राला जे पूत्र झाले, ते सर्व पट्टरांणी, जी गांधारी तिचे समजले गेले. गांधारीला एकच कन्या होती. म्हणजे कन्या हत्या कौरवात होती हे उघड झाले. स्त्रीयांना वारसा हक्कातून वगळण्यात आल्यामुळे त्यांना जंगम मालमत्ते समान मानले जावू लागले. राजपदाची निर्मिती ही कुटुंब व मालमत्ता सुरक्षीत राखण्याच्या गरजेतून निर्माण झाली असल्याचा महाकाव्यांचा दावा आहे.[8] शांतिपर्वात भिष्मपितामह नच राजा, नच प्रजा काळाचे वर्णन करतात.

रामायण असे निदर्शनास आणते की, राजा नसलेल्या समाजात मालमत्ता सुरक्षीत राहत नाही व स्त्रीवर बंधने राहत नाहीत. स्त्रीया वखाजगी मालमत्तेचे संरक्षण करणे हे शासनाचे अत्यंत महत्वाचे कर्तव्य असल्याचे, महाभारताने स्पष्ट केले आहे. महाभारतातील एका उल्लेखानुसार दासांना संपत्तीचा हक्क नसे. दासाची पत्नी त्याच्या धन्याच्या मालकीची असे. राज्यसभेत आणलेल्या द्रोपदीला उद्देशून ''आता तू केवळ एक 'दासी' आहेस'' असा उल्लेख करण्यात आलेला आहे. द्रोपदीला तिच्या पतींनी स्वतःच्या इतर मालमत्ते प्रमाणे जुगारात पणाला लावले, यावरून असे सिध्द होते की, त्या काळी स्त्री ही पुरूषांची मालमत्ता समजली जात असे.[9]

आपले सिंहासन घेतील या भीतीने कंस आपली बहीण देवकीच्या मुलांना ठारमारतो, देवकी आपल्या नवऱ्याबरोबर कंसाच्या घरी राहते म्हणून नवऱ्याचे स्थान दुय्यम होते. याचा अर्थ अशा टोळया होत्या की, ज्यात नवऱ्याला पत्नीच्या टोळीत रहावे लागे आणि मुलांवर पत्नीच्या भावाचा अधिकार असे. यावरून हे स्पष्ट होते की विकासाच्या आधीच्या टप्प्यात कंस आणि कृष्ण यांच्या टोळीत मल्याळ बहुपतित्व रूढ होते. हळूहळू टोळी मातृप्रधान समाजातून पितृप्रधान व्यवस्थेकडे येत होती. परंतु टप्प्याटप्प्याने वारसा बहीणीच्या मुलाकडे असे. महाभरतात कुंती आहे. जिला अनौरस मुलगा होता. ती ती समाजातील सन्माननीय व्यक्ती होती. अनौरस खिस्त जसा मेरीला होतो. तसा कुंतीला सुध्दा कर्ण झाल्याचे दिसते. जो दर्जा मेरीचा तोच दर्जा कुंतीला प्राप्त होतो. रामायण, महाभारत इत्यादी वाङ्मयातून नियोगाला मान्यता असल्याचे आढळते.

धृतराष्ट्र, पंडू व विदूर यांचा नियोगातून जन्म झाला होता. नवऱ्याने नेमलेल्या पुरूषाबरोबर प्रजोत्पती साठी तिला संग करावे लागे. वसुदेवाच्या मुलाने आपल्याला ठार मारून आपली गादी बळकावू नये व आपल्या टोळीच्या सर्व स्त्रीयांवर हक्क प्रस्थापीत करू नये म्हणून कंस देवकीच्या सात मुलांना मारतो. कृष्ण आणि इंद्र भारतीय इतिहासातील प्रसिध्द लोकनायक, यांनी मातृसत्तेचा नाश करून पितृसत्ता कायम करण्याची ऐतिहासीक भूमिका बजावली. कृष्णाने सांगितलेल्या गीता ग्रंथात स्त्रीयांचे स्थान शुद्रा सारखेच होते.[10] गीता सरंजामशाही व्यवस्थेचे तत्वज्ञान होय.

वेदकाळातील काही स्त्रीया विव्दान म्हणून प्रसिध्द आहेत म्हणजेच त्या काळी स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीच्या होत्या आणि त्यांना स्वतःची बुध्दिमता वाढविण्याची संधी मिळत होती हे खरे आहे. परंतु नंतरच्या महाकाव्यात व धर्मग्रथांत एकाही कर्तृत्वान. किंवा बुध्दिमान स्त्रीचा उल्लेख नाही. हजारो पाने असलेल्या महाभारतात एकाही महान व्यक्तिमत्वाच्या स्त्रीचा उल्लेख नाही. सीता, सावित्री, अहील्या, दमयंती या आदर्श स्त्रीया आहेत. त्या विनम्र आहेत आणि पतिपूढे शरनागती पत्करणे व पतीच्या हितासाठी कोणताही त्याग

करण्याची तयारी दाखविणे हे त्यांचे प्रमूख गुण आहेत. महाभारत व रामायण तसेच पुराण यातून पती हा पत्नीचा दैवत असल्याचा उल्लेख वारंवार येतो. महाभारत काळात स्त्रीयांचे सर्व आयुष्य पुरूषांच्या अधिन असल्याचे दिसून येते.

***निष्कर्ष :–***

अशाप्रकारे रामायण व महाभारत काळातील स्त्री जीवनाचे त्यांच्या प्रतिच्या समाजाच्या, सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीकोनाचे अध्ययन केल्या अंती दिसून येते की, पूर्व वैदिक काळातील स्त्री जीवन, त्यांच्या प्रतिचा समाज व सत्ताधारी यांचा दृष्टीकोन, दिली जाणारी वागणूक व केला जाणारा आदर यात बदल घडून आला होता. रामायण व महाभारत काळातील स्त्री जीवन व दृष्टीकोनाचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे उच्चवर्गीय स्त्रीया व सर्वसामान्य स्त्रीया यांच्या बाबतीतला फरक होय. उच्च घराण्यातील स्त्रीयांना काही प्रमाणात स्वातंत्र्य होते. त्यांच्या शब्दाला किंमत होती. पण द्रोपदीच्या उदाहरणावरून स्त्री ही पुरूषाची मालमत्ता समजल्या गेली होती. त्यामुळेच जुगारात तीचा वापर केल्या गेल्याचेही दिसून येते.

वैवाहिक जीवनाचा विचार केल्यास रामायण काळात पुरूष एकापेक्षा अधिक स्त्रीयांशी विवाह करू शकत होता मात्र स्त्री ही एक पतिव्रता जपत असल्याचेही दिसून येते. त्याचप्रमाणे स्त्रीकडून तीच्या चारित्र्याच्या जपवणूकीची अपेक्षा केली जात होती. तीचे चारित्र्य व प्रामाणीकपणा हे संशयातीत असले पाहिजे असा आग्रह असल्याचे सीतेच्या उदाहरणावरून दिसून येते.

मात्र महाभारत काळात वरील स्थितीत बदल घडून आला. द्रौपदीच्या उदाहरणावरून अनेक पतीत्वाची पध्दतीही रूढ असल्याचे दिसून येते. ही पध्दती उच्च घराण्यापुरती मर्यादीत होती की, सर्व सामान्यांमध्येही ती अस्तित्वात होती हे निश्चितपणाने सांगता येत नाही. तत्कालीन सामाजिक, धार्मिक व विशेषतः आर्थिक परिस्थितीचा विचार करता ही व्यवस्था केवळ उच्च घराण्यापूरती मर्यादीत असावी असे दिसते. तसेच एकपतीत्वाचीही प्रथा अस्तित्वात होती. पुरूष अनेक स्त्रीयांशी विवाह करू शकत होता, विवाह बाहय संबंधही ठेऊ शकत होता. हे कौरव व पांडवांच्या इतिहासावरून दिसून येते. पुत्र प्राप्तीसाठी पर पुरूषांशी संबंध ठेवणे महाभारतात अनैतीक व गैर मानले जात नव्हते हे अनेक उदाहरणावरून दिसून येते. पण सामाजिक स्वास्थाचा व हिताचा विचार करता या बाबी नक्कीच योग्य व अनूकरणी नव्हत्या, असेच म्हणावे लागेल. याबाबतीत रामायण काळ हा अधिक समाजहिताचा होता असाही निष्कर्ष काढता येतो.

एकूनच रामायण व महाभारत कालीन स्त्रीयांची स्थिती समाधानकारक नव्हती. स्त्रीजीवनावर व कार्यावर बंधने होती. स्त्रीयांकडे खाजगी मालकत्तेच्या दृष्टीनेच बघितले जात होते असेच म्हणता येईल. हेच प्रतिबिंबीत करण्याच्या उद्देशाने सदर शोध निबंध तयार केला आहे. निष्कर्षाचे बाबतीत भिन्न विचार व दृष्टीकोन अपेक्षीत आहे.

***संदर्भ सूचीः–***


1)श्रीधर व्यंकटेश केतकर– महाराष्ट्रीय ज्ञानकोष, पुणे, 1920, पृ. 206
2)म. ना. लोही – कृषि केंद्रीत वैदीक धर्म आणि संस्कृती, मुंबई, 1993, पृ. 109
3)र. ना. गायधनी – प्राचीन भारतीय स्त्री जीवन, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2007, पृ. 4
4)रामशरण शर्मा – प्राचीन भारतीय समाज व्यवस्था व अर्थ व्यवस्था यावर प्रकाश झोत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 1978, पृ. 25
5)वि. का. राजवाडे – भारतीय विवाह संस्थेचा इतिहास, लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2004, पृ. 56
6)कित्ता – पृ. 22
7)रामशरण शर्मा – पूर्वउल्लेखित, पृ. 25
8)र. ना. गायधनी – पूर्वउल्लेखित, पृ. 22
9)स. मा. गर्गे – भारतीय समाज विज्ञान कोष, समाज विज्ञान प्रकाशन, पुणे, 1986, पृ. 421
10)डी. डी. कोसांबी – पुराण कथा आणि वास्तवता, अनु. वसंत तुळपुळे, मुंबई, 2004, पृ. 26, पृ. 46

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com